**विशाखा सावंत–१ वि. निलीन तांबे–१.**
**(सीएनआर क्र.MHRG–13000–530–2018)**

## निशाणी क्र.२४ वर आदेश.

०१. प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांना दाव्याचे समन्स लागल्यापासून ९० दिवसात कैफियत दाखल करावयाची होती परंतु सदर मुदतीत दाव्या संबंधी महत्वाची कागदपत्रे प्राप्त न झाल्याने ९० दिवसाचे अवधित कैफियत दाखल करता आली नसल्याचे कथन प्रतिवादी यांनी सदर अर्जाद्वारे केले आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द विना कैफियत असा आदेश पारित करण्यात आला होता. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्यात त्यांना ९२ दिवसांचा विलंब झालेला असून विलंब माफ करुन सदरचे म्हणणे दाखल करुन न घेतल्यास त्यांचे हक्कावर गदा येईल. करिता सदर अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.२ यांनी केली आहे.

०२. वादी यांनी सदर अर्जावर प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जात विना कैफियत काम चालविण्याचा मे. न्यायालयाने केलेला हुकूम रद्द करण्यासाठी कोणतेही योग्य व सबळ कारण दिलेले नाही. त्याच प्रमाणे कैफियत दाखल करण्यासाठी विलंब का झाला याची कोणतीही कारणमिमांसा अर्जात नमुद केलेली नाही. अर्जात नमुद केलेली कारणे बोगस व तकलादू असून सदर अर्जास जोरदार हकरत घेतली असून अर्ज

फेटाळण्याची विनंती केली आहे. तसेच सदर अर्ज मंजूर करावयास झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करण्याची विनंती केली आहे.

०३. सदर प्रकरणातील वादीतर्फे व प्रतिवादीतर्फे विद्वान वकील यांचे युक्तीवाद ऐकले. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर प्रकरणातील पक्षकारांमध्ये वादाचे कायम स्वरुपी निराकरण होण्यासाठी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने दोन्ही पक्षकारांना पुर्ण संधी देणे न्यायोचित होणार आहे. सदर अर्जातील कारणांचा विचार करता नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे दाखल करुन घेणे न्यायोचित होणार आहे. तथापि, झालेला विलंब पाहता कॉस्ट बसवणे गरजेचे आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **आदेश** ::

०१. नि.क्र.२४ वरील अर्ज रुपये ५००/- च्या कॉस्टवर मंजूर करण्यात येत आहे.

०२. येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

श्रीवर्धन. ( प्र. ग. लंबे )
दिनांक – ०३/०२/२०२०. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, श्रीवर्धन.